# तानाजीचा पोवाडा

## कविभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर

1940

तानाजीई मर्द सुभेदार। हिंदभूवर। सिंहाहून क्रूर। धडधडा मुंडकी उडवी गगनात। काळही कापतो ज्याला स्वप्नात। नम्र तो दास देशाचा खास॥ धृ॥

## चाल

एके दिवशी जिजाबाई। उठून भल्या पहाटेला। विचार करून मनमनी प्रश्न केला शिवबाला। कोंडाण्यावर सत्ता यवनांची त्रास जिवाला। हा गड घ्यावा हातात। हा तात घेवून हातात। महाराष्ट्रात खुशाल तुम्ही नाचा॥
शिवाजीने केला निश्चय गड घेण्याचा। बोलावला तानाजी सखा कलिजा जीवाचा। जीवाला जीव देणारा मित्र हा साचा। रायगडी आला तातडी। तातडी म्हणे सवंगडी। चला या घडी मुहूर्त लग्नाचा॥
शिवाजीने दिले उत्तर जावे लग्नाला। कोंडाणा घेवून मी येतो वरात बघण्याला। तानाजी म्हणे ऐकाव मम वचनाला। आधी मुहूर्त धरला लग्नाचा। लग्नाचा गड कोंडाण्याचा। मग रायबाच्या करू लग्नाला॥
बारा हजार मावळा जसा दरीचा सिंह। एकाहून एक पराक्रमी सूर्याजी ऊग्र। शेलार मामा पटा ईत जसा दरीचा व्याघ्र। सैन्यासह आले झडकरी। झडकरी घेतली बरोबरी। सदा यशकारी त्यान घोरपड॥

## चाल

यशवंती फिरली माघारी। सुचविते भिती लयी भारी॥
मामा सांगे त्यास परोपरी। चल जावू आता माघारी॥

तान्ह्या म्हणे चढा सत्वरी। काय बिशाद कापू गडकरी॥

मिळवणी- चढविला हल्ला जोरदार। कोंडाण्यावर। तानाजी म्होर। सिंहाची झडप गडावर खास। शेळ्यांचा चेन्दा मेंदा करणार। कविभूषण प्रल्हाद गाणार॥ १॥

## चाल

उदेभान रजपूत होता सरदार। बाटून झाला किल्लेदार। व्यसनात गुन्ग फार। अठरा बिब्या त्याच्या महालात। महालात हो भोगितो स्त्रीया निभ्रांत॥
अठरा हजार सेना होती सारी रणमस्त। आटोकाट देती गस्त। कडेकोट बंदोबस्त। मध्यरात्र गडद अंधार। अन्धार हो ना दिसे कोणी मगरमस्त॥
कापाकापी केली त्यान एका निमिषात। पाचशे रजपूत ख्यात। पठाण वेगळा एकजात। अर्धा गड केला उध्वस्त। उध्व्वस्त हो रक्ताचा सडा दरोबस्त॥
जखमी झाले कितिएक पडले रस्त्यात। कित्येकांचे तुटले हात। कैक गेले स्वर्गात। कैकांच्या मुंड्या गगनात। गगनात हो वाटते चेन्डू उधळीत॥

## चाल

धुमश्चक्री आली जोमात। रक्ताचे पाट वाहतात॥
युद्ध झाले तेथे घनघोर। रक्ताचे पाट वाहतात॥
उदेभानास म्हणे सुभेदार। द्वंदास व्हावे तैय्यार॥

## चाल

पट्याचा सळ चढविला। महादेव त्यान वाहिला। ढाल होती डाव्या हाताला। उदेभान त्यास बोलला। सुभेदारा पहिला वार येवू दे तुझा सलामिला॥
सुभेदार ऐक हिताला। तू येरे मोंगल सेवेला। गडकरी करीन मी तुला। तुच ऐकरे माझ्या वचनाला। शिवाजीच्या नेतो भेटीला। पाप जाईल तुझ रे विलयाला। कुत्र्याहून नीच तू देशद्रोही निपजला॥
धुमश्चक्री झालि समयाला। जखमा होती सार्या अंगाला। का पळस फुलला वाटतो

याच जागेला॥

भानून वार जवा केला। ढालीचा चक्काचूर केला। तानाजीई नाही हादरला। मुंडास बांधून हाताला। लढतसे धीर गंभीर भिती ना त्याला॥

चवताळून भानू समयाला। पट्ट्याच्या फेकून फेकिला। तानाजी उभा कापिला। तानाजी पडता धरणीला। जयद्रथ मारी लाथेला। तशी लाथ मारूनी भानू चालू लागला॥

शेलार मामा म्हणे त्याजला। कुठे चाललास लवंडिच्या हिस्का दावतो मी तुला॥

मामान वार तवा केला। उदेभान उभा कापला। सुर्याजीने कहर मंग केला। गड घेवून आपले हाताला। भगवा झेंडा लावला बुरूजाला। खुणेचा जाळ तवा केला। आनंद झाला शिवबाला। तान्ह्यान गड सर केला। चलाचला त्याच्या भेटिला। घाई घाई आला गडाला। तानाजीच्या पाहून मुडद्या ला। ढसढसा रडू लागला। गड आला पण सिंह गेला निघून स्वर्गाला॥

रायबाच्या केल लग्नाला। सुर्याजी गडकरी केला सिंहगडाला॥

मिळवणी- मिळविला जय शर्थीन। गेले हादरून। सर्व यवन। विजापूरवाला बसला चिडिचूप। दिल्लिचा शहा तसा तो गूप। प्रल्हादरायाच कवन रणरूप॥ २॥